THEMATICS
PUBLICATIONS PVT LTD
www.thematicsjournals.org

ISSN 2320-6263

# RESEARCH ARENA

A MULTI-DISCIPLINARY INTERNATIONAL REFEREED RESEARCH JOURNAL

THEMATICS PUBLICATIONS
www.thematicsjournals.org

VISHWABHARATI
RESEARCH CENTRE

Scanned by CamScanner

www.thematicsjournals.org

ISSN [illegible]

# RESEARCH ARENA

A MULTI-DISCIPLINARY INTERNATIONAL REFEREED RESEARCH JOURNAL

Vol 3 ★ Issue 7 ★ Oct [illegible]

EDITORIAL BOARD
INDER SINGH THAKUR Shimla (HP)
NIGAMANANDA DAS Kohima (Nagaland)
MEGHA BHARTI Almora (UK)
SAJJANRAO JADHAV Buldana (MS)
S. S. AHIRE (MS)
SHISHU PAUL Fatehpur (HP)
SADHANA CHAUHAN Dhar (MP)
UMA BHOWMIK Tura (Meghalaya)
SONIA BAJAJ Bhilai Nagar (CG)
SIDDIQUI ELIZ Aurangabad (MS)
RASHMI JAIN Sagar (MP) India
SAYED MUJAHID Tirupati (AP)
SUBHA LAMBA Meerut (UP)
ASHISH DAVE Mehsana (Gujarat)
KIRTI SHRIVAS Raipur (CG)
AMRENDRA BISWAL Kurukshetra (Haryana)
CHETANA SINGH Dhamtari (MP)
S. BHAGAWATHI PERUMAL Kanyakumari (TN)
ARUNA BOSANA Dausa (Rajasthan)
ARCHANA JHA Durg (CG)
VINOD KUMAR BHATNAGAR Gwalior (MP)
ALKA HIRKANE BALAGHAT (MP)

RESIDENT EDITORS
SATISH SHELKE Osmanabad (MS)
KALPANA ZARIKAR Aurangabad (MS)
H. M. MIRZA Osmanabad (MS)
MAHESH MOTE Osmanabad (MS)
SWATI AROHAPURKAR Beed (MS)

Executive Editor
VISHNU PATIL Aurangabad (MS)

Editor
RASHEED DARGA Gulbarga (Karnataka)

Editor-in-Chief
S. S. KAMBLE Osmanabad (MS)
[illegible]@gmail.com
Cell: [illegible]

THEMATICS
PUBLICATIONS PVT LTD
www.thematicsjournals.org

RESEARCH ARENA
ISSN 2320-6263
Vol 2. Issue 7. Oct 2014.
http://www.thematicsjournals.org/RA
© THEMATICS Publications Pvt Ltd

## CONTENTS

DAISY AS GANGA: PORTRAYAL OF AN EMANCIPATED WOMAN IN R.K. NARAYAN'S *THE PAINTER OF SIGNS*
**Anoop Kumar**
7 - 15

LOUISE ERDRICH-A WRITER WITH AN EDGE: OVERVIEW
**Yamini Pendyala**
16 - 26

TRANSLATION OF KARNAD'S *BROKEN IMAGES* INTO MARATHI: A STUDY
**S. S. Upase**
27 - 30

किरकोळ व्यापारातील परदेशी थेट गुंतवणूकीचे परिणाम
**बी. के. मोरे**
31 - 34

औरंगाबाद जिल्ह्यातील कांदा पीक उत्पादनाचा भौगोलिक अभ्यास
**विष्णु काकासाहेब सोनवणे**
35 - 39

HIGHER EDUCATION IN INDIA: GROWTH TRENDS AND QUALITY GAPS
**N. A. Yamanur & H. H. Uliveppa**
40 - 48

Scanned by CamScanner

THEMATICS PUBLICATIONS PVT LTD
www.thematicsjournals.org

RESEARCH ARENA
ISSN 2320-6263
Vol 2. Issue 7. Oct 2014. pp. 35-39
http://www.thematicsjournals.org/RA
Paper received: 27 Aug 2014.
Paper accepted: 09 Sep 2014.
© THEMATICS Publications Pvt Ltd

# औरंगाबाद जिल्ह्यातील कांदा पीक उत्पादनाचा भौगोलिक अभ्यास

**विष्णु काकासाहेब सोनवणे**

**सारांश:**

मानवाच्या दैनंदिन वापरात कांदा वापर वाढत आहे. त्यामुळे कांदा उत्पादनास बाजारपेठेत मोठी मागणी निर्माण होत आहे. त्यातून शेतकरी बाजारीभिमूख नगदी पिक म्हणून कांदा पिकाचे उत्पादन घेण्यकडे आकर्षित झालेला आहे. इतकच नाही तर काही शेतकऱ्यांचे अर्थव्यवस्थेचे साधन कांदा पिक उत्पादनावरच आधारलेले आहे. औरंगाबाद जिल्ह्यात याचा परिणाम मोठ्या प्रमाणात दिसुन येतो. जिल्ह्यातील कांदा उत्पादनाच्या अभ्यासातुन जिल्ह्यातील भौगोलिक घटकाबरोबरच जलसिंचनाच्या सुविधा, उपलब्ध बाजारपेठ या घटकांचा कांदा उत्पादनावर प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी कांदा उत्पादनात दिवसेंदिवस वाढ करीत आहेत. मात्र भौगोलिक घटक व सांस्कृतीक घटकांच्या परिणामामुळे जिल्ह्यातील कांदा उत्पादनाचे वितरण असमान आहे. प्रस्तूत शोधनिबंधात जिल्ह्यातील पिक उत्पादनाचा व वितरणाचा अभ्यास करण्यात आला आहे.

औरंगाबाद जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असून जिल्ह्यात कोरडवाहू बरोबरच जलसिंचना खालील शेतीचे प्रमाणही मुबलक

**विष्णु काकासाहेब सोनवणे:** मिल्लीया महाविद्यालय, बीड (महाराष्ट्र).

Scanned by CamScanner

आहे. जलसिंचन क्षेत्रातील शेतात पारंपारीक नगदी पीकाबरोबरच शेतकरी बाजारभिमूख नगदी पिकाचेही मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतात. नगदी पीक म्हणून कांदा पीकाचे उत्पादन घेण्यामध्ये अनेक शेतकऱ्यांचा कल असून कांदा पीक उत्पादनावरच काही शेतकरी आपले आर्थिक नियोजन आखात असतात. त्यामुळे कांदा पीक उत्पादन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळाचा बनलेला आहे. कांदा कधी 'रडवतो तर कधी हसवतो' या उक्ती प्रमाणे कांदा पीक उत्पादनाचे बाजारात भाव निश्चित नसतात. शेतकऱ्याचे वार्षिक नियोजनावर परिणाम पडतो. म्हणुनच शेतकऱ्यांच्या आर्थिक सुधारणे बरोबर सामाजिक विकासात कांदा पिक उत्पादनाचा मोठा परिणाम जाणवतो या साठी प्रस्तूत शोधनिबंधात कांदा उत्पादनाचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्ट्ये:**

१. जिल्ह्यातील कांदा पिक उत्पादनाचा अभ्यास करणे.

२. शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेत कांदा पिक उत्पादनाचे महत्व लक्षात घेणे.

३. जिल्ह्यातील कांदा पिक उत्पादन वितरणाचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१. जिल्ह्यातील विषय भौगोलिक परिस्थितीचा कांदा पिक वितरणावर परिणाम पडला आहे.

२. जलसिंचन सोयींचा कांदा पिक उत्पादनात महत्वाची भूमिका आहे.

**अभ्यासक्षेत्र:**

औरंगाबाद जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तर-मध्य भागात येत असून जिल्ह्याचा विस्तार १९° ते २०° उत्तर अक्षवृत्त व ७४° ते ७६° पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १०१०० चौ. कि.मी. असून जिल्हा दक्षिण पठारावरील क्षेत्रात येतो. जिल्ह्याच्या एकुण क्षेत्रफळापैकी ८,५,९,८४६ हेक्टर जमीन शेतीसाठी उपयुक्त असुन सिंचनाखालील एकुण क्षेत्र १,४६,६८३ हेक्टर असुन एकुण लागवडीच्या १७.२१% इतके आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील बहुतांशी मृदा अग्नीजन्य खडकापासून बनलेली काळी रंगाची आहे. जिल्ह्यातील वैजापूर, गंगापूर, पैठण, सिल्लोड या जिल्ह्यात सुपीक मृदा आढळते तर सोयगाव, कन्नड, खुल्ताबाद व औरंगाबाद तालुक्यातील मृदा कमी प्रतीची व हलकी आहे. जिल्ह्याच्या उत्तर-पश्चिम भागातून महत्वपूर्ण पूर्णा-गोदावरी नदीचे खोरे गेलेले आहे. जिल्ह्यात गोदावदी व त्याच्या उपनद्या उदा. पूर्णा, शिवजा, खाम, दुधना, गल्हाटी, गिरजा या सुद्धा विविध भागात प्रवाहीत होतात. औरंगाबाद

Scanned by CamScanner

जिल्ह्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ६७५.४६ सें.मी इतके असुन पर्जन्यातील सरासरी लक्षात घेता जिल्ह्यात जास्तीत जास्त कोरडवाहू स्वरुपाची शेती केली जाते. पिकांचे खरिप व रब्बी हे दोन हंगाम असून जलसिंचनाच्या सुविधा असलेल्या भागात भाव नगदी पिकांचे उत्पादन घेतले जाते. जिल्ह्यात, ऊस, संत्री, कापूस या नगदी पिकाबरोबरच कांदा या बाजारभिमूख नगदी पिकांचेही उत्पादन घेण्यात येते.

कांदा ही आवरणयुक्त कंद वनस्पती असून 'अंलियम केपा' या शास्त्रीय नावाने कांदा पिकास ओळखले जाते. कांद्याच्या सुमारे २०० जाती असल्या तरी सर्वसाधारणापणे तांबडा कांदा व पांढरा कांदा या दोन मुख्य जाती समजल्या जातात. तांबडा कांदा चविला तिखट असून बाजारात या कांद्यास अधिक मागणी आहे. या कांद्याची लागवड साधारणतः हिवाळ्यात केली जाते. पांढऱ्या कांद्याची लागवड पावसाळ्यात केली जाते. बाजारातील मागणी लक्षात घेता तांबडा कांदा शेतकरी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात बी. पेरुन रोप तयार करुन नंतर त्याची लागवड करतो व नंतर त्याचे उत्पादन होते. कांदा उत्पादन उत्तम प्रकारे होण्यासाठी खालील घटकांची आवश्यकता असते.

१. पाण्याचा निचरा होणारी हलकी ते मध्यम जमिन/मृदा.
२. मुरमाड जमिनीत सेंद्रीय खताचा वापर.
३. आवश्यक तेव्हा पाणी पुरवठा/जलसिंचन सुविधा या घटकाबरोबरच कांदा पिक उत्पादन वाढीवर बाजारपेठ हा प्रभावशाली घटक आहे.


जिल्ह्यातील कांदा पीक उत्पादनाचा अभ्यास करता असे लक्षात येते की, जिल्ह्यात आढळणारी प्राकृतिक घटकातील भिन्नता, हवामान मृदातील वेगळेपणा, जलसिंचनाच्या सुविधा व बाजारपेठ या घटकांचा परिणाम पडलेला असून कांदा पिकांचे वितरण व उत्पादन जिल्ह्यात असमान स्वरुपाचे आहे ते खालील तक्त्याच्या निरिक्षणावरुन लक्षात येते.

| अ.क्र. | औरंगाबाद जिल्हा | कांदा पिकाखालील क्षेत्र (हेक्टर) | |
|---|---|---|---|
| | | २०१०-११ | २०११-१२ |
| १ | कन्नड | २४०० | ९२० |
| २ | सोयगाव | १०० | ४५० |
| ३ | सिल्लोड | १५०० | १७३३ |
| ४ | फुलंब्री | १०० | २८२ |
| ५ | औरंगाबाद | ४०० | ३५३ |
| ६ | खुलताबाद | १०० | १६५ |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | वेजापूर | ७०० | ३८६३ |
| ८ | गंगापूर | २५०० | ३३२३ |
| ९ | पैठण | १००० | १२०८ |
| | **एकुण** | **८८५०** | **१२२९९** |

**आधार:** जिल्हा अधिक्षक, कृषि कार्यालय, औरंगाबाद.




२०१०-११ व २०११-१२ या दोन वषातील कांदा पिक उत्पादनाचा अभ्यास करता असे लक्षात येते की, २०१०-११ च्या तुलनेत २०११-१२ या वर्षातील पिक उत्पादनात तब्बल १५% घट झालेली आहे. ही घट त्या वर्षी जिल्ह्यात पडलेल्या कमी पर्जन्याचे प्रमाण व त्यामुळे उद्‌भवलेली दुष्काळी परिस्थितीमुळे झालेली होती.

**निष्कर्ष:**

तालुकानिहाय कांदा पिक उत्पादनाचा अभ्यास करता जिल्ह्याच्या दक्षिण भागात म्हणजेच वैजापूर तालुक्यात सर्वाधिक कांदा (३१.४२%) उत्पादीत झालेला आहे. कारण या जिल्ह्यात गोदावरी नदी खोऱ्यामुळे जलसिंचन सुविधा व सूपिक मृदा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. वैजापूर खालोखाल गंगापूर (२७.०१%) व सिल्लोड (१४.०९%) तालुक्यातही कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सर्वात कमी कांदा उत्पादन खुलताबाद तालुक्यात होते ते जिल्ह्याच्या एकुण उत्पादनाच्या १.३४% इतके कांदा उत्पादन होते. कारण खुलताबाद तालुक्यात जलसिंचन सुविधेचाही

अभाव जाणवतो. त्यामुळे या तालुक्यात कांद्याचे कमी उत्पादन होते. निष्कर्ष व कांदा पिक उत्पादनास बाजारपेठमध्ये खात्रीशिर बाजारभाव उपलब्ध नसल्याकारणाने कांदा पिक लागवडीवर परिणाम होत चाललेला आहे. बाजारपेठेत कधी कधी अतिरिक्त जास्त भाव मिळतो तर कधी कधी माफक दरात विकला जातो. ज्यामुळे या पिकास खात्रीशीर भाव मिळत नसून कांदा पिक उत्पादन हे लहरी स्वरुपाचे बनलेले आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील कांदा पिक उत्पादनाचा वितरणाचा अभ्यास करता असे लक्षात येते की, जिल्ह्यात कांदा उत्पादनास खूप मोठ्या प्रमाणात वाव असून जिल्ह्यातील अपूऱ्या जलसिंचनाच्या सुविधा व तसेच बाजारपेठेमधील खात्रीशीर बाजारभावाचा अभाव येथील कांदा उत्पादनावर विपरीत परिणाम घडवून आलेला आहे.

जिल्ह्यातील कांदा पिक उत्पादनात वाढ करण्यासाठी जलसिंचन सुविधे बरोबरच, खात्रिशीर बाजारभाव, शेतकऱ्यांना कांदा पिक लागवडीस प्रोत्साहन, विविध सवलती देणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक कणा समजला जाणारा कांदा पिक उत्पादनात निश्चित प्रमाणात वाढ होऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

Scanned by CamScanner